IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

# भारतीय संत परंपरेमधील महिला संतांचे योगदान

**प्रा. डॉ. रवींद्र श्रीहरी सोमोशी**

मराठी विभाग प्रमुख,

सुंदरराव मोरे महाविद्यालय, पोलादपूर- रायगड

**प्रस्तावना:-**

स्त्रियांचा तो संग नको नारायणा असा एक अभंग तुकोबांच्या गाथ्यात पहावयास मिळतो. स्त्रियांची संगत चांगली नाही. त्या काष्ठाच्या मातीच्या बाहुल्या आहेत. त्यांच्याशी एकान्त करू नये. ज्ञानेश्वरकालीन एका थोर सत्पुरुषाने म्हटले आहे की, चित्रातीलही स्त्री पाहू नये. यावरून सर्वसामान्य समाजाचा असा समज होईल की संत हे स्त्रि द्रष्टे आहेत. एखादी स्त्री नटून थटून तुकाराम महाराजांसमोर आली व मलताच हट्ट करू लागली. तर नको नको हा स्त्रियांचा सांगात. जाये ओ माये न करी सायास । आम्ही विष्णुदास तैसे नव्हे । असेच ते म्हणणार.स्त्रिच्यापोटीच सर्व संतांनी जन्म घेतला, माता, भगिनी मावशी या रूपांत संतांनी तिच्याकडे पाहिले नसेल काय? मुक्ताबाई, जनाबाई बहिणाबाई, वेणाबाई, कान्होपात्रा इत्यादी सर्व स्त्रिया संतांना मान्य होत्या ना स्त्रिची निंदा संतानी केली ती केवळ अहोरात्र तिचाच नाद ज्यांना लागला आहे. त्यांना उद्देशून. खरे पहाता स्त्रि ही परमार्थातील धोंड नसून एक थोर मार्गदर्शिका आहे, असेच दिसून येईल. वयोवृध्द चांगदेवाची गुरु लहान मुक्ताबाईच होती. मनाची एकाग्रता सहनशीलता समर्पण बुध्दी व एकनिष्ठता इ. गुण भारतीय स्त्रित अधिक आहेत. अस असताना सुद्धा एक लेखक स्त्रिला नरकाची वाटाडी म्हणतो. सॉक्रेटिसाच्या मते स्त्री ही सर्व अशुभाचे उगमस्थान आहे तर टरटयुलिन म्हणतो स्त्री नरकाचे महाद्वार आहे.

**कूट शब्द भारतीय संत परंपरा, महिला संत, अध्यात्म, भक्तिमार्ग, लोकपरंपरा, लोकसाहित्य**

आधुनिक भारतातील स्त्रियांचा दर्जा व सामाजिक स्थान अजमावण्यापूर्वी गेल्या काही शतकांतील स्त्रियांच्या आकांक्षा व त्यांची फलश्रुती यांचा संगतवार इतिहास अभ्यासिला पाहिजे पाचव्या शतकापासून दक्षिण भारतात भक्तिमार्गी तत्वज्ञानाची जी भरभराट सुरू झाली ती सातव्या शतकांत चालूंच होती. या दोनशे वर्षात शैव वैष्णव दोन्ही संप्रदायांत जे अनेक प्रसिध्द साधुसंत होऊन गेले त्यात काही स्त्रिसंत होत्या या सगळ्या भारतीय स्त्रिसंताचा आढावा घेतल्यास.

गायीच्या खुरामुळे पृथ्वीवर निर्माण झालेल्या छोटयांश्या खळग्यांत पाणी साठले तरी विशाल आकाशाचे प्रतिबिंब ज्याप्रमाणे त्यांत दिसू शकते त्याच प्रमाणे भारतीय महिला संताचे कर्तृत्व आकाशाला गवसणी घालणारे आहे. त्यानिमित्ताने सगळया स्त्रियांचा आढावा घेणे श्यक्यच नाही. नाहीतर त्याला जत्रेचे

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

स्वरूप प्राप्त होईल त्यानिमित्ताने भारतीय संत (शंकर वासुदेव अभ्यंकर) व भारतातील थोर स्त्रिया (प्राचार्य सोनोपंत दांडेकर ) यांच्या लेखनातुन घेतलेला हा आढावा.

१) कर्नाटकातील संत अक्क महादेवी

हिंदू धर्म आणि संस्कृतीच्या इतिहासात कर्नाटकाचा वाटा सिंहाचा आहे. कर्नाटकाच्या मातीला मक्तीचा सुगंध आहे. कर्नाटकाची थोरवी गाताना प्रत्यक्ष भक्तीने आचार्य नारदाला भगवंतान सांगितले आहे. च उत्पन्ना द्रविडे साऽह वृध्दि कर्णाटके गताछ । भाग माहात्म १.४८ भक्ती म्हणते भी द्रविड देशात उत्पन्न झाले. आणि कर्नाटकात वर्धिष्णु पावले । अक्का महादेवी ही कर्नाटकतील, वीरशैव संप्रदायातील थोर संत हिचा जन्म एका शैव दांपत्याच्या पोटी झाला.

२) काश्मीरमधील संत- लल्लेश्वरी

भूतलावरील नंदनवन असा ज्याचा गौरव केला जातो तो निसर्गाने नटलेला घ्काश्मीरङ प्रांत म्हणजे भारतभूमीच्या मस्तकावरील दैदिप्यमान मुकूटच. घ्काश्मीरच्याङ या गूढवादी संत कवयित्री ला लल्लेयोगेश्वरी ङ लालदीदी छ म्हणून ओळखतात. ही इ.स.च्या चौदाव्या शतकात होऊत गेली. हिची जीवनकथा चमत्कार आणि दंतकथा यांनी झकाळलेली आहे. सर टिचर्ड टेम्पल यांनी हिच्यावर लिहिलेल्या पुस्तका व्यतिरिरक्त व पं. आनंद कौल यांनी लोकगीतांच्या व परंपरेच्या आधारे ६ लल्ला योगेश्वरी जीवन आणि बोध डही पुस्तीका प्रकाशित केली आहे. या व्यतीरिक्त इतर माहिती उपलब्ध नाही. समाजाला शिकवण स्तुती आणि निंदेन मूळे वस्तूत काहीच फरक पडत नाही. म्हणून जाणल्याने शांत मनाने दोन्हींचा स्वीकार केला पाहिजे प्रसिध्द शैवसंत सेदवायू याचे शिष्यत्व हिने पत्करले सूफी उपासनेचा हिच्यावर मोठा प्रभाव होता.

३) तामिळनाडूमधील संत आंडाळ

दक्षिण भारताचा एक मुख्य प्रांत तिरूपति पर्वतापासून कन्याकुमारीपर्यंत आणि पूर्व समुद्रापासून दक्षिण सागरापर्यंतथा प्रदेश या प्रांतात येतो. नाडू म्हणजे प्रांत अर्थात तामिळ भाषिकांचा हा प्रांत आहे. आंडाळ हि तामिळनाडूमधिल एक थोर स्त्री संत वैष्णव वारा आळूवार संतामधील एकमेव स्त्री संत दक्षिणेची मीराबाई म्हणून हिचा गैरव केला जातो. ही गोदा या नावानेही सर्व श्रुत आहे. आळवार या शब्दाचा स्थूलमानाने अर्थ हरिभक्तपरायण असा करता येईल बहुसंख्य अभ्यासकांच्या मते हिचा जन्मकाळ इ.स.७१५ या आहे. पारंपारिक अख्यायिकेप्रमाणे मदुराईजवळ श्री विल्लिपुतुर या गावात पेरियाडवार हा संत राहात होता या वैष्णव संताला तुळशीच्या वनात एक नवजात मुलगी सापडली ते अनाथ बाळ पाहून हे संत गहिवरले त्यांनी तिला घरी आणले ही मुलगी पुढे आंडाळ नामक थोर वैष्णव संल झाली आंढाळचा एक अर्थ जिने

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

प्रत्यक्ष भगवंताला प्राप्त केले ती किंवा भगवंताप्रत उत्कट भाव व्यक्त करणारी असाही आहे. तात्पर्य हिचे संपूर्ण जीवनच कृष्णमध्य झाले होते.

४) राजस्थान संत मिराबाई (घायल की गति घायल जान)

शक्ती आणि मक्तीचा अलौकिक वारसा सांगणारा राजपुताना म्हणजेच राजस्थान होय. अति प्राचीन संस्कृतीचे अवशेष राजस्थानात सापडतात. राजस्थानातील आणि भारतातील एक महान स्त्री संत उत्तर भारतामध्ये सुरदास, तुळशीदास कबीर यांच्यासारखे अनेक महान संत झाले या सर्व पुरूष संतामध्ये एकमेव थोर स्त्री संत म्हणजे हीच होय. हिच्या जीवनवृत्तांची अधिकृत माहिती इतिहासात मिळत नाही. हिच्या जीवन प्रवाहांबद्दल दोन विचारप्रवाह आहेत. पहिल्या मताप्रमाणे ही मेवाडच्या प्रसिध्द महाराणा कुंमाची पत्नी होती. मैथिल कवी विद्यापतीची ही समकालीन कवयित्री होती हा कालखंड संवत १४६८ च्या असपास आहे. दुसरे मत असे मीराबाई ही राठोडवीर जैमल याची पत्नी होती आचार्य रामचंद्र हीचा जन्मकाल संवत १५७३ मानतात. डॉ. रामकुमार वर्मा पंडित परशुराम इत्यादी विब्दांनांच्या मते हिचे जन्माचे वर्ष संवत १५५५ आहे. डॉ. धीरेंन्द वर्मा. डॉ. श्रीकृष्ण लाल यांच्या मते मीरेचा जन्म संवत १५६० मध्ये झाला. तथापी हिच्या जन्मविषयाची निश्चित अशी माहिती उपलब्ध नाही. संत गुरुताई सुगंधेश्वर

गुळवणी महाराज यांच्या परंपरेत गुरुताई सुगंधेश्वर हिचे नाव घेतले जाते. हिचे मुळ गाव सौ कल्पनाताई यशवंत त्रिवेदी ही राजस्थानातील जयपूर जिल्हातील इंटाळी खेडा या गावची दत्तभक्तीचा प्रसार करणारी होती.

५) दिल्ली बीबी फातिमा साम

मोगल साम्राज्य शाहीत एकीकडे तृष्ण खून रक्तपात यांनी सामान्य जनतेला हैराण केलेले होत तर दुसरीकडे धर्म म्हणजेच नितिप्रधान पारमार्थिक समाधानाचा मार्ग दाखविवण्यासाठी अहोरात्र बीबी फतिमा झटत होती. शुध्द चारित्र्यावर तिचा फार भर असे ती म्हणे दहा हजारा उपवार आणि प्रार्थना करण्यांपेक्षा भाकरीचा तुकडा व पेलाभर पाणी देण्याऱ्यावर लोक अधिक खुष होतात.

६) रायचूर तुंगम्मा

ही आनंददासाधी कन्या हिचा जन्म रायपूर जिल्हात झाला ही अतिशय मपूर स्वरात गात असे. हिच्या गाण्याने पशुपक्षीही मंत्रमुग्ध होत असता हीच्या पुण्यनामाचे स्मरण करून श्रद्धापूर्वक करतात. हिने काही पदे रचली मात्र ती उपलब्ध नाहीत.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

७) तुर्कस्तान - संत रबिया

भारतीय अधात्मविचाराव सूफी पंथाचा प्रभाव पडलेला स्पष्ट दिसतो या पंथातील रबिया या नावाची एक मोठी संत आठव्या शतकात होऊन गेली. या रबियाला जन्म तुर्कस्थानात बसरा येथे झाला.

८) महाराष्ट्र महदंबा

मराठी वाङःमयाला ज्ञात असलेली महाराष्ट्रातील पहिली मराठी संत कविसित्री महादाइसा महानुभव पंथातील चक्रधरस्वामींची शिष्या महादाइसा जन्म व निधन शंकाबद्दल अजून तरी निश्चीत माहिती उपलब्ध नाही. मात्र ती मागदेवाचार्यापूर्वी निधन पावली एवढे निश्चित. हिंदू विधवेने घरात काबाडकष्ट करावे फारतर वयस्कर झाल्यावर पुराण-कथा ऐकावी एवढेच स्वातंत्र तीला होते परंतु चार भींतीच्या मार्यादा ओलांडून आपलाविकासाचा मार्ग शोधणारी पहिली स्त्री म्हणून महदंबा नाव आपल्याला अभिमानाने घ्यावे लागते.

मुक्ताबाई

महानंदेनंतर कालानुक्रमाने विचार करावा लागतो मुक्ताबाईचा ही ज्ञानदेवांची धाकटी बहीण नामदेवांच्या अभगांचे आधारे मुक्ताईचा जन्म शके १२०१ हाच योग्य वाटतो ज्ञान हे वयावर अवलंबून नसते विशेषतः आध्यामिक क्षेत्रात तर हे विशेषच महत्वाचे आहे. गुलाबाच्या फुलाप्रमाणे मुक्ताबाईचे जीवन अल्पकालीन ठरले वयाच्या केवळ अठराव्या वर्षी अंगावर वीज पडून हिचा अंत झाला.

मंगळवेढा संत गणिका

दामाजीपंत चोखामेळा इत्यादी संतामुळे मंगळवेढे गाव प्रसिध्द आहे. या गावी आणखी एक थोर गणिका संत म्हणून प्रसिध्द झाली परमेश्वराच्या दरबारात जातिभेद नाही स्त्री-पुरूष असा फरक नाही स्वअनुभवावरून समाजाला दिलेला संदेश

मराठवाडा संत बहिणाबाई

मराठवाडयातील एक संत कवयित्री म्हणून बहिणाबाईचे नाव प्रसिध्द आहे. सासर माहेर गरिबी. नवरा मिक्षुक व संतापी तशात ऐन वयात दाद्यांनाही घर सोडून जावे लागले बहिबाईची कविता प्रसिद्ध असून तिथे सुमारे साडेसातशे अभंग आपणासमोर आहेत. मराठीत प्रथम आत्मवृत्त लिहिणारी कवियित्री म्हणून बहिणाबाईचे नाव प्रसिध्द आहे. तिने ऐंशी अमंगात स्वःताचा झालेला छळ संकोच न करता सांगितला आहे. बहिणाबाईचा आणखी एक विशेष असा की त्यांनी अंतकाळी आपल्या मुलास आपल्या मागील जन्माची हकीकत विस्ताराने व नाकानिशी सांगितली आहे.

कोल्हापूर-वेणाबाई

समर्थ रामदासस्वामी यांच्या परिवारात अनेक स्त्रिया शिया म्हणून आहेत. वेणाबाई या समर्थांच्या परिवारातले तेजस्वी रत्न मिरजेच्या मठाची ती प्रमुख समर्थ संप्रदायात उभे राहून किंर्तन करण्याची अनुज्ञा फक्त वेणाबाईलाच होती.

**अक्काबाई**

**समर्थ रामदास स्वामीची एक प्रमुख शिष्या कन्हाडच्या रूद्राजीपंत देशपांडे यांची कन्या ही बालविधवा होती समर्थाच्या निधनानंतर ४० वर्षांनी कार्तिक शुध्द प्रतिपदेला सज्जनगडावर हिचा देहांन्त झाला.**

**कान्होपात्रा**

**है.विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी कान्होपात्रेचा अंदाजी काल शा. शके १३९० दिला आहे. तोच बरोबर असावा असे वाटते. प्राचीन लेखकांनी कान्होपात्रा हिह ज्ञानदेवसमकालीन असल्याचे सांगितले आहे. पंढरपुरापासून सुमारे सात कोसांवर मंगळवेढे हे इतिहास प्रसिद्‌ध गांव आहे तेथे शामा नावाची एक वेश्या तिची कन्या कान्होपात्रा.**

**समारोप**

**भारतीय संप्रदायांच्या औदार्यामुळे अनेक संप्रदाय व पंथात स्त्री संतांचा उदय झाला. मंगैयरकरसी सारख्या राणीपासून कान्होपात्रे सारख्या गणिकेपर्यंत, सोयराबाईसारख्या अस्पृश्य सामान्य स्त्रीपर्यंत स्त्री संत निर्माण झाले**

**संदर्भग्रंथ**

1. दांडेकर सोनोपंत, (१९८५) भारततीतल थोर स्त्रीया
2. जोशी प्र. न. ,( १९९८) **दैनंदीन संतदर्शन**
3. अभ्यंकर शंकर, (२००३) **भारतीय संत**
4. बडवे सतीश आणि इतर,(२०१५)मध्ययुगीन साहित्य:अवलोकन आणि निरीक्षणे, प्रशांत पब्लिकेशन जळगांव.
5. नसिराबादकर ल .रा . (२०१०) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशकोल्हापूर
6. https://vishwakosh.marathi.gov.in/40923/Accessed on 09/02/2024